निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतन धारक यांना महागाई वाढीचे अतिप्रदान होण्याचे प्रसंग टाळण्यासाठी करावयाची सुधारित उपाययोजना. -२५-

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक - मकोनि-१०००/प्र.क्र.१८८/कोषा-प्र-५,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ४ मार्च २००२

**प्रस्तावना :**

केंद्र अथवा राज्य शासन किंवा स्वायत्त संस्था,खाजगी अनुदानित संस्थामध्ये नियुक्त अथवा पुनर्नियुक्त निवृत्तिवेतनधारकांना कुटुंब निवृत्तिवेतन धारकांना त्यांच्या निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनावर महागाई वाढ अनुज्ञेय नाही. अशा निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन धारकांना निवृत्तिवेतनावर/कुटुंब निवृत्तिवेतनावर दिलेली महागाई वाढ अशा कर्मचाऱ्यांच्या नियोक्त्याने त्यांच्या वेतनातून कापून घ्यावी अशा सुचना महाराष्ट्र कोषागार नियम २६२ अन्वये देण्यात आल्या आहेत. तथापि अशा कर्मचाऱ्यांच्या नियोक्त्यांकडून या सुचनांचे काटेकोर पालन होत नाही. परिणामतः महागाई वाढीचे अतिप्रदान होऊन या रकमेची वसूली करण्याचे प्रमाण अलीकडे फार मोठया प्रमाणावर वाढले आहे. अतिप्रदान झाल्याचा कालावधी व हे लक्षात आल्यानंतर वसुली सुरु करण्याची कार्यवाही दरम्यान जर बराच कालावधी गेला असेल तर वसुलीची रक्कम फार मोठी होते. ही वसुली एक रकमी करणे शक्य नसते. वसुली विहित दराने सुलभ हप्त्यात करावी लागते. यामुळे शासनाचा फार मोठया प्रमाणावर पैसा फार मोठया कालावधीकरिता अडकून पडतो. महालेखापाल कार्यालयाने अशी अनेक प्रकरणे शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहेत. या परिस्थितीचे निराकरण करण्यासाठी शासनाने महागाई वाढ प्रदानाच्या कार्यपध्दतीत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र कोषागार नियम २६२ मध्ये सुधारणा करुन शासन आता पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

(१) अर्थसंकल्पीय वर्ष २००२-२००३ पासून ( एप्रिल २००२ पासून ) केंद्र अथवा राज्य शासन किंवा त्यांच्या स्वायत्त संस्था, खाजगी अनुदानित संस्थांच्या सेवेत नियुक्त अथवा पुनर्नियुक्त असलेल्या राज्य शासनाच्या निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन धारकांच्या वेतनातून, त्यांच्या निवृत्तिवेतनावर देय असलेल्या महागाई वाढीची रक्कम, त्या कर्मचाऱ्याच्या वेतनातून त्याच्या नियोक्त्याने कापून घेऊ नये. निवृत्तिवेतन संवितरण अधिकाऱ्याने अशा निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन धारकांना त्यांना देय असलेल्या महागाई वाढीचे प्रदान करु नये. नियुक्ती प्राधिकारी जर राज्य शासनाबाह्य अधिकारी असेल तर त्याने असा कर्मचारी राज्य शासनाचा निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक आहे व तो कोणत्या कोषागारातून निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन घेतो इत्यादी बाबींची नोंद वेतन देयकात त्या कर्मचाऱ्याच्या नावासमोर घेणे अनिवार्य आहे. पुनर्नियुक्ती देताना देखील अशा कर्मचाऱ्याची निवृत्तिवेतन विषयक संबंधित सर्व माहिती त्याचे कडून लेखी घेऊन ती माहिती संबंधित कोषागार अधिकाऱ्याला सर्व तपशिलासह तात्काळ कळविणे आवश्यक आहे. याचबरोबर वर्षातून एकदा म्हणजेच जून महिन्याच्या वेतन देयकासोबत कार्यालय प्रमुखाने त्यांच्या आस्थापनेवरील अशा सर्व पुनर्नियुक्त

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी
22 MAR 2002
शाखा
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी



209/211

निवृत्तिवेतन धारक किंवा सेवेत असलेल्या कुटुंब निवृत्तिवेतनधारकांची माहिती स्वतंत्रपणे खालील विवरणपत्रात कोषागाराकडे पाठविणे अनिवार्य आहे.

आस्थापनेवरील पुनर्नियुक्त निवृत्तिवेतनधारक किंवा कुटुंब निवृत्तिवेतन धारक यांची माहिती

कार्यालयाचे नांव : ____________________

| अनु.क्र. | निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनधारकाचे नांव | नियुक्तीचा दिनांक | निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक | दरमहा निवृत्तिवेतनाचा दर व त्यावरील महागाई वाढ | निवृत्तिवेतन प्रदान करणाऱ्या कोषागाराचे नांव | निवृत्तिवेतन खाते असलेल्या बँकेचे नाव व खाते क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

कोणत्याही कार्यालयाकडून जून महिन्याच्या देयकासोबत उपरोक्त विवरणपत्रात माहिती प्राप्त न झाल्यास असे वेतन देयक कोषागार अधिकाऱ्याने आक्षेप लावून परत करावे. कोषागारात सदर विवरणपत्र वेतन देयकापासून वेगळे करून पुढील कार्यवाहीसाठी त्यांच्याच कार्यालयातील निवृत्तिवेतन शाखेकडे पाठविण्यात यावे. या शाखेत सदर विवरण पत्रातील तपशिल व त्यांच्या कडील अभिलेख्यांची पडताळणी करण्यात यावी. एखादया प्रकरणी अनुज्ञेय नसताना प्रदान होत आहे असे आढळल्यास महागाई वाढीचे प्रदान तात्काळ बंद करावे व अतिप्रदानाची वसुली विहित पध्दतीनुसार तात्काळ सुरू करावी. जर एखादा कर्मचारी अन्य कोषागारातून निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतन घेत आहे असे आढळल्यास संबंधित कोषागार अधिकाऱ्याला तात्काळ सुचित करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत याबाबतची माहिती योग्य वेळी कोषागारास सादर करावयाचे राहून गेल्यास व परिणामत: अतिप्रदान झाल्यास यास कार्यालय प्रमुखांना जबाबदार धरले जाईल.

(२) निवृत्तिवेतन संवितरण अधिकाऱ्याने प्रथम निवृत्तिवेतन /कुटुंब निवृत्तिवेतन प्रदानाबाबत कोषागार विषयक विहित कार्यवाही करताना निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन धारकाकडून, तो केंद्र अथवा राज्य शासन किंवा त्यांच्या स्वायत्त संस्था, खाजगी अनुदानित संस्थांच्या सेवेत नियुक्त अथवा पुनर्नियुक्त आहे किंवा कसे याबाबत तपशिलवार माहिती प्राप्त करून घ्यावी. जर निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतन धारक उपरोल्लेखित कार्यालयांच्या सेवेत कार्यरत असेल तर त्यांच्या नियुक्ती अथवा पुनर्नियुक्तीच्या कालावधीत त्यास देय असलेल्या निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनावरील महागाई वाढीचे प्रदान निवृत्तिवेतन संवितरण अधिकाऱ्याने करू नये.

(३) दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतन धारकाने हयातीच्या दाखल्यासोबत त्यांच्या नियुक्ती अथवा पुनर्नियुक्ती बाबत देखील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. नोव्हेंबर महिन्या व्यतिरिक्त वर्षाच्या उर्वरित कालावधीत जर निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतन धारक उपरोल्लेखित कार्यालयांच्या सेवेत नियुक्त झाला, तर त्याने त्याच्या नियुक्तीची तपशिलवार माहिती संबंधित अधिदान व लेखा अधिकारी किंवा कोषागार अधिकाऱ्यास तात्काळ अवगत करावी. अशीच माहिती नियोक्त्या कडून देखील कोषागार कार्यालयाला प्राप्त होणार आहे. ही माहिती अन्य कोणत्याही मार्गाने अधिदान व लेखा अधिकारी किंवा कोषागार अधिकाऱ्याला प्राप्त झाली तर संबंधित कार्यालयाकडून आवश्यक ती सर्व माहिती त्वरीत प्राप्त करून घेऊन, त्याच्या नियुक्तीच्या/ पुनर्नियुक्तीच्या दिनांकापासून त्याला देण्यात आलेल्या निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनावरील महागाई वाढीच्या रकमेच्या वसुलीची कार्यवाही विहित कार्यपध्दतीनुसार तात्काळ सुरू

करण्यात यावी. निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतन धारकाने सादर करावयाचा वार्षिक प्रमाण पत्राचा नमुना पुढीलप्रमाणे असेल.

## पुनर्नियुक्तीचे/नियुक्तीचे प्रमाणपत्र

दिनांक :

मी__________________________( निवृत्तीवेतन/कुटुंब नि.वे. धारकाचे नाव ) प्रमाणित करतो/करते की, मी राज्य अथवा केंद्र शासनाच्या अथवा राज्य शासनाच्या अनुदानित खाजगी / स्वायत्त संस्थेच्या सेवेत नियुक्त अथवा पुनर्नियुक्त आहे /नाही.

### पुनर्नियुक्तीचा/नियुक्तीचा तपशील

| संस्थेचे नाव | नियुक्तीची तारीख |
|---|---|
| | |

पुनर्नियुक्ती/नियुक्ती संपुष्टात आली असल्यास त्याचा दिनांक :

निवृत्तीवेतन/कुटुंब नि.वे.धारकाचा तपशील — निवृत्ती वेतन/कुटुंब नि.वे.धारकाची स्वाक्षरी

बँकेचे नाव :-

शाखेचे नाव :-

निवृत्तीवेतन आदेश क्रमांक :-

(४) सदर सुधारित पध्दत सुरु करण्यासाठी मात्र अशा निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतन धारकांची माहिती मिळविण्यासाठी अधिदान व लेखा तसेच कोषागार अधिकाऱ्यांनी मार्च २००२ पासून निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतन धारकांच्या बँकेमार्फतच उपरोक्त विहित नमुन्यातच माहिती प्राप्त करून घ्यावी. एप्रिल २००२ पर्यंत माहिती उपलब्ध करून देण्याची मुदत सर्व निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतन धारकांना देण्यात यावी. सर्वांची माहिती लवकरात लवकर उपलब्ध करुन घेणेबाबत प्रयत्न करण्यात यावे. माहिती अभावी महागाई वाढ प्रदान न करण्याच्या कोषागार स्तरावरील कार्यवाहीस जून २००२ पर्यंत मुभा राहील. परंतु दरम्यानच्या कालावधीत माहिती उपलब्ध झाली नसल्याने महागाई वाढ देय ठरत नसताना प्रदान करण्यात आली असल्यास कोषागार अधिकाऱ्याने अशा अतिप्रदान केलेल्या रकमेची तपशिलवार माहिती निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतन धारकांना देवून विहित दराने वसुली तात्काळ करण्यात यावी.

(५) सर्व प्रशासकीय विभागांना असे सूचित करण्यात येते की त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व स्वायत्त संस्था, खाजगी अनुदानित संस्थांच्या प्रमुखांना अशा स्पष्ट सूचना दयाव्या की त्यांच्या आस्थापनेवर जर राज्य शासनाचे निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतन धारक नियुक्त अथवा पुनर्नियुक्त असतील तर त्याबाबतची तपशिलवार माहिती संबंधित कोषागार कार्यालयाला त्वरीत अवगत करण्यात यावी.

एच-1049(10,000+10-3-02)-2.

भविष्यात नियुक्ती देतानाच कर्मचारी महाराष्ट्र शासनाचा निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतन धारक आहे किंवा कसे याची तपशिलवार माहिती कर्मचाऱ्याकडुन घेण्यात यावी व ती संबंधित कोषागार अधिकाऱ्याला कळविण्यात यावी.

महाराष्ट्र कोषागार नियमात अनुषंगिक सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

क. कि. पारकर
शासनाच्या अवर सचिव.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,